प्रकाशकार्याचे वृत्तपत्र



महर्षी अमर (१९१९–१९८२)

**ऋषींनी शिकवले तसे आम्ही ध्यान शिकवतो.**

## प्रकाश

सृष्टीमागील बुद्धिमान शक्ती आहे. प्रकाश म्हणजे स्वतः परमेश्वरच.

## प्रकाशकार्य

सर्वोत्तम जीवन जगण्यासाठी, सर्व जीवांना त्यांच्या जाणीवेची आणि अनुभवाची पातळी उंचावण्यात मदत करणे आहे.

## प्रकाशजीव

या आणि उच्च जगात राहणारे ऋषी आहेत. ते ज्ञानाचा प्रकाश आणि शक्ती गोळा करतात आणि पसरवतात.

## सप्तऋषी

सर्वोच्च आध्यात्मिक अधिकारी आहेत. ते निवडलेले महात्मे आहेत. ते, सर्व जीवांना इथे शांती आणि परिपूर्णतेचे जीवन जगण्यासाठी आणि त्यांचे मूळ म्हणजे प्रकाशाकडे परत जाण्यासाठी त्यांचे मार्गदर्शन करतात.

## महर्षी अमर

प्रत्यक्ष सप्तर्षींच्या संपर्कात असणारे एक विशेष महात्मे होते. त्यांनी उच्च जीवनाच्या सत्ययुगासाठी ज्ञान आणि मार्गदर्शक सूचना उच्च जगातून पृथ्वीवर आणल्या.

## गुरुजी कृष्णानंद

महर्षी अमरांचे पट्टशिष्य होते. त्यांनी ऋषींचा मार्ग, सप्तर्षी ध्यानयोग विकसित केला आणि तपोनगरात सप्त ऋषींच्या आध्यात्मिक केंद्राची स्थापना केली.

## सप्तर्षी ध्यानयोग

हा लौकिक आणि आध्यात्मिक जीवन योग्य रीतीने जगण्यासाठी ऋषींनी शिकवलेला ध्यानाचा आणि भावनांना व विचारांना सकारात्मक बनविण्याचा एक अद्वितीय मार्ग आहे.

## दृढ वचन

- ★ आपण एकाच दिव्य प्रकाशाचे (परमेश्वराचे) कण आहोत.
- ★ प्रेम हा आपला स्वभाव आहे.
- ★ शांतता ही आपली भाषा आहे
- ★ ध्यान हा आपला मार्ग आहे
- ★ हे जग आपले आश्रयस्थान आहे
- ★ सर्व सृष्टीच आपलं कुटुंब आहे
- ★ परमेश्वर आपला गुरु आहे; ऋषी आपले मार्गदर्शक आहेत.

# प्रकाशमार्ग

Volume 11 Issue 12 SEPTEMBER 2019 Rs. 25

## चिंतन

गुरुजी कृष्णानंद

(जानेवारी १९९२ या अंकामधून, अनुवाद : जयंत देशपांडे)

इंस्टंट कॉफी सारख्या त्वरित मिळणाऱ्या गोष्टींसाठी लोक वेडे झाले आहेत ! २१ दिवसात नवी भाषा शिका, १४ दिवसात दम्यावर उपाय, ७ दिवसांत वजन कमी करा ! प्रसिद्धीसाठी बनवलेली घोषवाक्ये व्यापार वाढवण्यासाठी अगदी काहीपण आणि सर्वच काही शक्य असल्याचा दावा करतात. सुरुवातीला आध्यात्मिक क्षेत्रात सुद्धा अशाप्रकारची घोषवाक्ये आणि प्रचार काही लोकांना आकृष्ट करू शकतील पण आध्यात्मिक क्षेत्रात इंस्टंट निर्वाण किंवा इंस्टंट समाधी शक्य नाही. निर्वाण किंवा समाधी विकल्या जाऊ शकत नाही आणि त्याची खरेदी सुद्धा शक्य नाही. त्यासाठी साधकाला खूप परिश्रम करावे लागतात, शिस्त पाळावी लागते आणि परिणामासाठी धीर धरून वाट पाहावी लागते. हे सत्य आहे, लोकं आकृष्ट होवोत किंवा नाही. मी माझ्या साधक मित्रांना हेच नेहमी समजवण्याचा प्रयत्न करत असतो. मेहनत करा; ध्यान करा; अगदी दुसऱ्याच दिवशी कुंडलिनी जागृत होईल अशी अपेक्षा करू नका; अगदी पुढच्याच आठवड्यात सर्व समस्यांचे निराकरण व्हायला पाहिजे अशी अपेक्षा करू नका. परिश्रमाशिवाय, प्रयत्नांशिवाय जर कोणाला इंस्टंट समाधी अपेक्षित असेल तर मला म्हणावे लागेल की, त्यांचा दृष्टिकोनच वेगळा आहे.

एका मित्राने माझ्या बोलण्याच्या आणि लिहिण्याच्या – संक्षिप्त आणि अगदी मुद्द्याला धरून – पद्धतीचे कौतुक केले. मला त्याबद्दल माहीत नाही. कदाचित जेव्हा आपण ते सांगण्याचा प्रयत्न करतो जे खरंच आपल्या मनात आहे आणि जेव्हा आपण केवळ लोकांना प्रभावित करण्यासाठी शब्दांचा किंवा चातुर्याचा वापर करत नाही, तेव्हा कदाचित लोकांना असे वाटत असावे. मला प्रामाणिक आणि खरे राहायचे आहे.

१८ मे १९९२ या दिवशी मला आश्रमात सामील होण्याला दहा वर्षे पूर्ण होतील. अमरांनी मला यासाठी इनिशियेट केले होते आणि कृष्णानंद हे नाव दिले होते. मला आनंद आहे की मी ऋषींच्या या मार्गाला चिकटून राहिलो आणि त्यांचे कार्य सुरू ठेवले. ऋषी मला खुणावत आहेत की, आता आणखी एक पाऊल उचलण्याची वेळ आली आहे – खरा संन्यास. भावी योजना व इतर तपशिलांबद्दल फक्त ऋषींनाच कल्पना आहे. मी केवळ एक साधन आहे. जेव्हा मला आश्रमात घेण्यात आले होते, तेव्हा माझ्या गुरुंनी मला सांगितले होते, "भगवी वस्त्रं घालू नकोस." आता मी त्यांच्याकडून सूचनांची वाट पाहात आहे.

ध्यानयज्ञात माझ्या सर्व मित्रांनी आणि साधकांनी भाग घ्यावा अशी माझी इच्छा आहे. ध्यानयज्ञादरम्यान आपण सहज आपली जाणीव विस्तारू शकतो आणि मूकपणे प्रेमाने परमेश्वराची सेवा करू शकतो. या प्रसंगी जुन्या आणि नवीन सर्व साधकांनी एकत्र यावे आणि शांतीसाठी होणाऱ्या ध्यानात सहभागी व्हावे, असे मला वाटते. परमेश्वरांचे आशीर्वाद सर्वांना मिळू देत. ■

**मानसा फाउंडेशन (रजि.)**
तपोनगर, चिक्कगुब्बि, (ऑफ हेन्नूर–बागलूर रोड) बंगलोर अर्बन ५६० ०७७. इंडिया.
फोन : ९९०००७५२८० (सकाळी १० ते सायं. ५ पर्यंत)
इ–मेल : info@lightagemasters.com वेबसाईट : www.lightagemasters.com